आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१९ एप्रिल २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- समुद्रात वाहून जाणारं त्रेपन्न टीएमसी पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आणण्याच्या योजनेचं काम, या वर्षअखेर किंवा पुढल्या वर्षाच्या सुरुवातीला सुरू होईल, असं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन
- अपेडानं महाराष्ट्रातून पाठवलेली भारतीय डाळिंबाच्या व्यावसायिक निर्यातीची पहिली खेप अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर पोहोचली.
- गेल्या आर्थिक वर्षात भारताच्या औषध उत्पादन निर्यातीने ओलांडला ३० अब्ज डॉलर्सचा टप्पा

**आणि**

- आयआयटी - जेईई मुख्य प्रवेश परीक्षेच्या सत्र-२ मधे १०० पर्सेंटाईल मिळवणाऱ्यांमधे महाराष्ट्रातले ३ विद्यार्थी

**<><><><><>**

समुद्रात वाहून जाणारं त्रेपन्न टीएमसी पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आणण्याच्या योजनेला मान्यता दिली असून या वर्षाअखेर किंवा पुढल्या वर्षाच्या सुरुवातीला हे काम सुरू होईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. बीड जिल्ह्यातल्या घाटशील पारगाव इथं ‘नारळी सप्ताह’ सांगता समारोहात ते आज बोलत होते. कृष्णा कोयनेच्या पुराचं पाणी मराठवाड्यात आणण्याच्या योजनेलाही मंजुरी दिली असून पुढल्या महिन्यात याची निविदा काढली जाईल, असं फडणवीस यांनी सांगितलं. अहिल्यानगर आणि सोलापूर दोन्ही बाजूने उजनी धरणातून तीस टीएमसी पाणी वळण बंधाऱ्याच्या माध्यमातून मराठवाड्यात येणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

मुख्यमंत्र्यांनी छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांशी संवाद साधला. राज्यातल्या अनेक भागातली पाणी टंचाई दूर करण्यासाठी आराखडा तयार करत असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. टंचाईग्रस्त जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना यावर उपाययोजना करण्याचे आदेश दिल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

अपेडा, अर्थात कृषी आणि प्रक्रियाकृत अन्न उत्पादन निर्यात प्राधिकरणानं महाराष्ट्रातून अमेरिकेला भारतीय डाळिंबाच्या व्यावसायिक निर्यातीची पहिली खेप पाठवली आहे. गेल्या आठवड्यात सागरी मार्गानं ‘भगवा’ जातीच्या भारतीय डाळिंबाच्या सुमारे १४ टन वजनाच्या चार  हजार ६२० पेट्यांची पहिली खेप अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावर पोहोचली असून ताज्या फळांच्या निर्यातीमधला हा महत्त्वाचा टप्पा असल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं प्रसिद्ध  केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

डाळिंबांचं शेल्फ लाईफ ६० दिवसांपर्यंत वाढवण्यासाठी अपेडानं ICAR- राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राच्या सहकार्यानं केलेलं  संशोधन यशस्वी ठरल्यामुळे भारतानं सागरी मार्गानं चाचणी स्तरावर डाळींब निर्यातीची पहिली खेप पाठवली.

**<><><><><>**

जंगलातली वनसंपदा ‘वणवा’ लागून नष्ट होऊ नये, यासाठी इतर देशांमध्ये केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करून वणवा पेटू नये यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश वन मंत्री गणेश नाईक यांनी दिले आहेत. वनविभागातली  योजना तसंच उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी महाबळेश्वर इथं आयोजित बैठकीत ते बोलत होते. वणवे रोखण्यासाठी ड्रोन, हेलिकॉप्टरसह इतर अत्याधुनिक यंत्रणाचा वापर करावा, वन विभागाच्या ज्या जमिनीवर झाडं उगवत नाहीत अशा जागांवर सोलर पार्क उभारण्याचा राज्य शासनाचा मानस असून वन विभागातल्या सर्व रिक्त जागा भरण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

मराठीसाठी आणि महाराष्ट्राच्या हितासाठी सगळी किरकोळ भांडणं सोडून सर्व मराठी माणसांनी एकत्र यावं आवाहन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलं आहे. मुंबईत ते कामगार सेनेच्या मेळाव्याला संबोधित करत होते. एकत्र येताना इतर कुणालाही कळत नकळत मदत करायची नाही, याची शपथ घ्या अशी अट त्यांनी ठेवली आहे.

**होल्ड - उद्धव ठाकरे....**

महाराष्ट्र मोठा आहे आणि त्याच्या अस्तित्वाच्या समोर उद्धव ठाकरे यांच्यासोबतची भांडणं फार किरकोळ असल्याचं मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी एका मुलाखतीत म्हटलं आहे. त्यावर उद्धव ठाकरे यांनी नाव न घेता ही प्रतिक्रिया दिली आहे.

<><><><><>

२०४७ पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकारण्यासाठी प्रत्येकानं आपल्या आरोग्याची काळजी घ्यायला हवी, असं आवाहन केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी केलं आहे. यकृत दिनाचं महत्व सांगण्यासाठी आज नवी दिल्ली इथल्या यकृत आणि पित्त विज्ञान संस्थेत, आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. निरोगी यकृत हा निरोगी शरीराचा पाया असून प्रत्येकानं त्यादृष्टीने आहार आणि व्यायाम यावर लक्ष द्यावं, असं ते म्हणाले.

यकृताच्या आजारांबद्दल जागृती वाढवण्यासाठी आणि तेलकट, चरबीयुक्त अन्न टाळून निरोगी जीवनशैली स्वीकारायला प्रोत्साहन देण्यासाठी आज जागतिक यकृत दिवस साजरा होत आहे. 'अन्न हेच औषध आहे', ही यंदाच्या जागतिक यकृत दिनाची संकल्पना आहे.

यकृताचे आजार हे भारतात मृत्यूसाठी कारणीभूत ठरणाऱ्या १० प्रमुख घटकांपैकी एक असल्याचं जागतिक आरोग्य संघटनेनं म्हटलं आहे. हेपटायटीस बी, सी आणि

हेपटोसेल्युलर कार्सिनोमा यासारखे यकृताचे आजार बहुतेकदा अल्कोहोल आणि ड्रग्जचं अती सेवन, आरोग्यासाठी घातक अन्नाचं दीर्घकाळ सेवन, बैठी जीवनशैली आणि व्यायामाचा अभाव, यासारख्या चुकीच्या जीवनशैलीमुळे होतात,असं अभ्यासातून स्पष्ट झालं आहे.

**<><><><><>**

वेव्हज अंतर्गत होणाऱ्या ॲनिमेशन चित्रपट निर्मात्यांच्या स्पर्धेच्या अंतिम फेरीत एकूण ४२ कलाकृती असणार आहेत. एकूण ४१९ कलाकृती यात सहभागी झाल्या होत्या. ॲनिमेशन, व्हीएफएक्स,  Augmented Reality - Virtual Reality आणि virtual production चा वापर करुन स्पर्धकांनी या कलाकृती बनवल्या आहेत. ९ महिन्यांच्या कालावधीत या कलाकृतींची छाननी करुन राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परीक्षकांनी ही निवड केली आहे. अंतिम फेरीतल्या सर्वांना आता १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणाऱ्या वेव्हज परिषदेत त्यांचं काम सादर करता येईल.

**<><><><><>**

आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये भारताच्या औषध निर्यात क्षेत्रानं  ३० अब्ज डॉलर्सचा टप्पा पार केला असून यापैकी एक तृतीयांश पेक्षा जास्त वाटा अमेरिकी बाजारपेठेचा आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या तुलनेत भारताच्या औषध निर्यातीनं नऊ  टक्क्यांहून जास्त वृद्धी नोंदवली असून, या काळात अमेरिकेत झालेल्या निर्यातीमध्ये १४ टक्के वाढ दिसून आली आहे. गेल्या आर्थिक वर्षात भारतातून सर्वाधिक औषध निर्यात झालेल्या देशांमध्ये युके, ब्राझील, फ्रान्स आणि दक्षिण आफ्रिकेचाही समावेश आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या मंगळवारी सौदी अरेबियाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. सौदी अरेबियाचे युवराज आणि प्रधानमंत्री प्रिन्स मोहम्मद बिन

सलमान यांच्या निमंत्रणावरून मोदी ही भेट देणार असून त्यांचा हा तिसरा दौरा असेल.

**<><><><><>**

एनटीए, अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं आज सकाळी 'जेईई मेन-२०२५' प्रवेश परीक्षेच्या सत्र-२ चे निकाल जाहीर केले. यंदा, एकूण २४ विद्यार्थ्यांनी जेईई मेन २०२५ पेपर एक मध्ये १०० पर्सेन्टाइल मिळवले आहेत. यामध्ये महाराष्ट्रातल्या सानिध्य सराफ, आयुष चौधरी आणि विशद जैन या तीन विद्यार्थ्यांचा समावेश आहे. परीक्षेचा निकाल कट-ऑफ यादीसह आता जेईई मेनच्या अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध आहे.

एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या जेईई मेन पेपर एक च्या, सत्र दोन साठी एकूण ९ लाख ९२ हजार ३५० उमेदवारांनी परीक्षा दिली होती.

**<><><><><>**

अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशननं आपल्या पेअर, अर्थात 'गतीशील नवोन्मेष आणि संशोधनासाठी भागिदारी' या कार्यक्रमा अंतर्गत निवड झालेल्या संस्थांची यादी जाहीर केली आहे. देशातल्या १८ प्रमुख संस्था १०६ सहभागी संस्थांचा यात समावेश आहे.

पेअर नेटवर्कच्या माध्यमातून देशातली विद्यापीठं आणि महाविद्यालयांना आघाडीच्या संशोधन संस्थांबरोबर जोडलं जाईल. कठोर मूल्यमापन केल्यावर निवड झालेल्या मुख्य संस्था आपल्या नेतृत्वाखाली सहभागी संस्थांबरोबर संयुक्त संशोधन आणि क्षमता विकास उपक्रम हाती घेतील.

निवड झालेल्या प्रमुख संस्थांमध्ये आयआयटी मुंबई आणि आयशर पुणे या संस्थांचा समावेश आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज अहमदाबाद इथं गुजरात टायटन्सचा सामना दिल्ली कॅपिटल्सशी होईल. गुजरात टायटनसनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. दुपारी साडेतीन वाजता हा सामना सुरु होईल. जयपूरमध्ये संध्याकाळी साडेसात वाजता होणाऱ्या दुसऱ्या सामन्यात, राजस्थान रॉयल्स आणि लखनौ सुपर जायंट्स आमने-सामने असतील.

**<><><><><>**

राज्यात  उन्हाचा कडाका वाढला असून तापमापकातला पारा आता ४२ अंश सेल्सिअसच्या पुढे जात आहे. उन्हाच्या या वाढत्या तीव्रतेमुळं पैठण इथल्या जायकवाडी धरणाच्या पाण्याचं मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन होत आहे. या बाष्पीभवनामुळं धरणातला जलसाठा झपाट्यानं कमी होण्यास सुरुवात झाली आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आज उष्ण आणि दमट हवामान राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**